अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरुळपीर, जि.वाशिम.
व्दारा संचालित
श्री.वसंतराव नाईक कला व श्री.अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय,
मंगरुळपीर, जि.वाशिम.



# अमरवाणी

## २०१८-१९

Scanned with OKEN Scanner

अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरूळपीर, जि वाशिम.
द्वारा संचालित
श्री वसंतराव नाईक कला व श्री अमरसिंग नाईक वाणिज्य
महाविद्यालय, मंगरूळपीर, जि वाशिम.



# अमरवाणी

## २०१८-१९



Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्राचे थोर नेते



## श्री.वसंतरावजी नाईक साहेब



Scanned with OKEN Scanner

# आमचे भाग्य विधाता

## संस्थापक




दानशूर श्री.अमरसिंग हरिचंद नाईक

आसोला खुर्द ता.मानोरा जि.वाशिम



Scanned with OKEN Scanner




मा.श्री.आत्माराम अमरसिंग राठोड



Scanned with OKEN Scanner

# प्राचार्य



डॉ.एल.के.करांगळे

Scanned with OKEN Scanner

# * मनोगत *

मंगरूळपीर सारख्या ग्रामिण भागात अमर शिक्षण प्रसारक संस्थाने १९७१ साली श्री वसंतराव नाईक कला व श्री अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना केली आज हे महाविद्यालय सुवर्ण महोत्सव वर्षाकडे वाटचाल करीत आहे. पाहता—पाहता आज हे रोपट वटवृक्ष होऊन बहरलेला आहे.

दानशूर बापू अमरसिंगजी नाईक यांच्या कृपाप्रसादाने व संस्थेचे अध्यक्ष मा.आ.अ. राठोड साहेब यांच्या अथक परिश्रमाने, मार्गदर्शनाने अत्यंत कुशलतापूर्वक महाविद्यालयाची यशस्वी वाटचाल सुरु आहे. शिक्षणाचा पवित्र वसा घेतलेलं श्री वसंतराव नाईक कला व श्री अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय, मंगरूळपीर हे शहराच्या बसस्थानकाच्या अगदी जवळ व वाशिम ते अमरावती या महामार्गाला लागून असल्यामुळे या महाविद्यालयात विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे.

महाविद्यालयात विविध प्रकारचे कार्यक्रम सातत्याने होत असतात थोर—मोठयांच्या जयंती, पुण्यतिथीचा कार्यक्रम व इतरही प्रासंगीक कार्यक्रम होत असतात या महाविद्यालयात रासेयोचे विद्यार्थ्यांचे मुला मुलींचे पथक असून दरवर्षी महाविद्यालयाच्या वतीने वैशिष्टयपूर्ण शिबिर घेण्यांत येते.

हे महाविद्यालय ग्रामिण महाविद्यालय असले तरी क्रिडा क्षेत्रामध्ये सुध्दा मागे नाही महाविद्यालयाच्या स्थापनेपासून आजतागायत या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अमरावती विद्यापीठाची चमू म्हणून आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये प्रतिनिधीत्व केलेले आहे. ही बाबा महाविद्यालयाचा गौरव वाढविण्यांस कारणीभूत ठरत असल्यामुळे त्या सर्व खेळाडू विद्यार्थ्यांचे कौतूक संस्थेचे अध्यक्ष मा.आ.अ.राठोड साहेब यांच्या हस्ते मन:पूर्वक अभिनंदन करण्यांत येते.

या महाविद्यालयाची निकालाची टक्केवारी सुध्दा अपेक्षित टक्केवारीपेक्षा नेहमी चांगली असते. यावरुन शिक्षण क्षेत्रात हे महाविद्यालय मागे नाही. ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांचा ज्ञानोदय व्हावा हा संकल्प मनात ठेवून उत्तरोत्तर महाविद्यालयाची कशी प्रगती होईल, हयावर संस्थेचे अध्यक्ष मा.आ.अ.राठोड साहेबांचे वेळोवेळी मार्मिक मार्गदर्शन असल्यामुळे खेळीमेळीच्या वातावरणात प्रगतीचे एक—एक पाऊल हे महाविद्यालय पुढे टाकत आहे.

प्राचार्य
श्री व.ना.कला व श्री अ.ना.वाणिज्य
महाविद्यालय,
मंगरुळपीर, जि वाशिम.



Scanned with OKEN Scanner

# ※ संपादकीय ※

या वर्षीचा 'अमरवाणी' चा अंक आपल्या हाती देतांना आनंद होत आहे. सुखाचे क्षण माणसाचं जगणं सुसाहय करतात. आजचा विद्यार्थी हा गतीमान युगाशी स्पर्धा करणारा आहे. या स्पर्धेत तो कितपत टिकू शकेल आणि या उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाच्या वातावरणात आपलं अस्तित्व कसं टिकवून ठेवू शकेल ही निकडीची जबाबदारी आज विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यावर येवून पडली आहे.

एकीकडे आपल्या परंपरागत संस्कृतीचा वारसा जपतांना दुसऱ्या बाजूने जागतिकीकरणाचा रेट सरकत आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात तर ज्ञानाचा स्फोट झाला आहे. उच्च शिक्षणाकडे बघण्यांचा दृष्टीकोण बदलत आहे. बेकारीचे प्रश्न सातत्याने वाढत आहेत. या सर्व प्रश्नांना तोंड देत आजचा युवावर्ग आपले मार्गक्रमण करीत आहे. त्याच्या पदरात किती पडते यावर सगळयांच्या नजरा एकवटून आहेत. आता जागतिकीकरणाची 'सुनामी' आलीच आहे तर आपणही त्यात वेढले जाऊ याची शक्यता नाकारता येत नाही.

'अमरवाणी' वार्षिकांकाच्या पुर्ततेसाठी ज्यांनी हातभार लावलेत त्यांच्या ऋणातून मोकळे होताच येणार नाही अमर शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा.आ.अ.राठोड साहेब यांच्या मार्गदर्शनाने 'अमरवाणी' वार्षिक्रांकास मूर्त स्वरूप प्राप्त झाले. तसेच ज्यांनी प्रत्यक्ष—अप्रत्यक्षरित्या या कामात सहकार्य केले त्या सर्वांचे आभार मानने मी माझे कर्तव्य समजतो.

ऋणनिर्देश

प्रा.डॉ.एस.ए.राठोड

मराठी विभाग

टिप :— 'अमरवाणी' वार्षिकांक मधील लेख व कवितेतून व्यक्त झालेली मते सबंधिताचीआहे.



Scanned with OKEN Scanner

# * अनुक्रमणिका *


१) 'गीता' एक ज्ञान सागर — उज्वल विजय गावंडे, बी.कॉम.भाग– २
२) तारुण्यगान — प्रदिपकुमार नेमीचंद कुमावत, बी.कॉम.भा– २
३) गावतल वडाचं झाड — कु कोमल विवेक टोपे बी.ए.भाग– २
४) सहकारातून ग्रामिण विकास — कु नेहा बबन आसोले ११ वी कला
५) जसे विचार तसा माणूस — कु नंदिनी भगत १२ वी कला
६) तुकारामाच्या अभंगातील सामाजिक मुल्य — प्रा.डॉ.एस.ए.राठोड


## कविता


१) गरीबांच्या माध्यमातून शिक्षणाची आवड — सुरज म कावरे, बी.कॉम.भाग– १
२) शिक्षण मी कस घेऊ — रुपेश भ पाचे, बी.कॉम.भाग– १
३) उदया कोणी पाहिला — चंद्रकांत माणिकराव ढगारे, बी.ए.भाग– १
४) दुनियाझाली गर्विष्ठ — राजेश विनोद जाधव, बी.ए.भाग– १
५) महाविद्यालयीन प्रेयसीचा सहवास — राजेश विनोद जाधव, बी.ए.भाग– १
६) कविता (संकलन) — राहूल नंदू कुटे, बी.ए.भाग– १
७) माझी लेक — कु वैष्णवी राजेश लुंगे, बी.ए.भाग– १
८) लढा म्हणा (संकलन) — कु विशाखा अनिल म्हस्के, बी.कॉम.भाग– ३
९) दमलेल्या बापाची कहाणी — कु धनश्री रेवानाथ पातूरकर, बी.कॉम.भाग– ३
१०) माझे बाबा — कु भाग्यश्री हरीओम लुंगे, बी.ए.भाग– १
११) देशाने स्पर्धेत तरुणाई विकली — कु आश्विनी सुरेश वंजारे, बी.कॉम.भाग – २
१२) सेंटर — कु दामिणी शिवनाथ गुप्ता, बी.कॉम.भाग– १
१३) माणसाचा जन्म कशासाठी — कु पुजा विजय शर्मा, बी.कॉम.भाग– २
१४) स्वप्न — कु कविता दहापूते, बी.कॉम.भाग– २
१५) आयुष्याची धावपळ — कु दिक्षा निरंजन भालेराव, बी.कॉम.भाग– २
१६) आयुष्य — कु महेश्वरी शिवभक्त म्हातारमारे, बी.काम.भाग– २
१७) टण्छण चा विद्यार्थी — सुयश मारोती पाचे, ११ वी वाणिज्य
१८) बाबा..... — गोपाल विष्णू गवई, ११ वी वाणिज्य
१९) दुष्काळ — सत्यम इंदल चव्हाण, ११ वी वाणिज्य
२०) मैत्री — अभिषेक संतोष पाचरणे, ११ वी वाणिज्य
२१) लढाई — दामोदर श्रीकृष्ण सोनटक्के, ११ वी वाणिज्य
२२) आई — विवेक सिध्दार्थ वंजारे, ११ वी वाणिज्य
२३) का रे हा दुरावा — कु आरती राजाभाऊ सोळंके, ११ वी वाणिज्य
२४) मित्र — अभय गजानन खडसे, ११ वी वाणिज्य
२५) शिक्षक म्हणजे — कु ज्ञानेश्वरी संतोष लुंगे, ११ वी वाणिज्य




Scanned with OKEN Scanner

# ✻ गीता एक ज्ञान सागर ✻

यदा यदा हि धर्मस्व ग्लानिर्भवति भारत। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम।।
परित्राणाय साधूना विनाशाय च दुष्कृताम। धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे।।

श्रीकृष्ण भगवतगीता सांगतात म्हणतात हे अर्जूना जेव्हा जेव्हा धर्माचा ऱ्हास आणि अधर्माची वाढ होत असते तेव्हा तेव्हा मी आपले रुप रचतो म्हणजेच आकार घेवून लोंकासमोर प्रकट होतो आणि धर्माची स्थापना रितो.

'भगवतगीता' हा प्राचीन भारतीय तत्वज्ञान विषयक ग्रंथ आहे.वेदांच्या अखेरच्या रचनेतील एक ग्रंथ म्हणजेच 'श्रीमदभगवतगीता होय यामध्ये भगवान श्रीकृष्णानी अर्जूनाला जीवनाबद्दल केलेला उपदेश आहे. महाभारतातील जिवनाचे सर्वात महत्वाचे संकलीत गीता आहे. गीता ही भगवान कृष्णाने युध्दात सांगीतलेली गाणी जीवनाचा अर्थ स्पष्ट करण्यांसाठी अर्जूनाला दिलेल्या शिकवणूकीची एक श्रृंखला आहे. महाभारतामध्ये श्रीकृष्णाने ई.पु. ३१३७ कुरुक्षेत्राच्या युध्दाच्या वेळेस अर्जूनाला गीतेचा उपदेश दिला होता. केवळ अर्जूनच नव्हे तर संजय हनुमान वैबरीक या तीन जणांनी गीतेचा संदेश कृष्णाकडून ऐकला होता.

गीता ही अर्जूनाला कुरुक्षेत्रावर कथन केली त्याकाळी त्यातील तत्वज्ञान जेवढे उपयुक्त आणि कल्याणकारी होते तेवढेच लाभदायक प्रत्येक माणंसासाठी ते आजही आहे. गीता ही माणसाला कल्याण मार्गाकडे नेणारी आहे. गीता तत्वज्ञान सांगत असेल तरीही त्यामध्ये कर्मयोग अत्यंत महत्वाचा भाग आहे. हा कर्मयोग माणसाला विज्ञानाचे महात्मय सांगतो. इतिहास सांगतो उदया सुख आहे. विज्ञान सांगतो उदया सुख होईल. परंतू धर्म सांगते की जर मनात सत्यता असेल तर प्रत्येक दिवशी सुख मिळेल.

प्रख्यात गणीतज्ञ 'आईन्सटाईन' म्हणतात मी जेव्हा गीतेचे वाचन करतो आणि विश्वास निर्मिती कशी झाली याचा विचार करतो तेव्हा बाकी सगळे विचार अगदी निरर्थक भासतात. गीतेची सर्वाधिक मोलाची शिकवण म्हणजे आपल्या कर्माच्या फळांची अपेक्षा आपण न करणे हेच 'ईष्ट' आहे. एक प्रकारे हीच शिकवण आहे सत्तेची प्रसिध्दीची ऐश्वर्याची नशा मनुष्याला एक प्रकारच्या भोवऱ्यात अडकवतात.

महाभारतात १८ अकांचे फार महत्व आहे. गीतेमध्ये १८ अध्याय आहे. श्रीकृष्णानी अर्जूनाला १८ दिवस जान दिले महाभारतातील युध्द १८ दिवस चालले आणि त्या युध्दात फक्त १८ शुरविर जीवंत राहीले होते. भगवतगीता हि मुळत: शास्त्रीय संस्कृती मध्ये लिहीलेली आहे. परंतू ती आता १७५ भाषेमध्ये अनुवादीत आहे. गीतेमध्ये १८ अध्याय आणि ७०० श्लोक आहेत.

'श्रीमध्दगवदगीता' हि भारतीय संस्कृतीची आधार स्तंभ आहे. आणि याचे निर्माते 'श्री वेदव्यासजी' आहेत. गीतेमध्ये स्पष्ट सांगीतलेले आहे. की, कधीही हार मानायची नाही कधीही एखादया कठीण कार्यासमोर हार मानुन वाईट कृत्य करु नये कारण जीवन व्यर्थ नाही तर ती वेळ बरोबर नाही बऱ्याच वेळा आपल्या पाहण्यात येते की लोक अगदी क्षुल्लक कारणामुळे क्रोधीत होतात. अशा वेळेस सहिष्णूतेपेक्षा आक्रमकतेची भावना बळावते आणि समस्या अधीक वाढते.

श्रीकृष्णाने खुप मोठी गोष्ट सांगीतली आहे. की जर तुम्ही धर्म कराल तर देवाकुडून तुम्हाला मागाव लागेल आणि जर तुम्ही कर्म कराल तर देवाला आपोआप तुम्हाला द्याव लागेल यासाठी जर तुम्ही विद्यार्थी असाल किंवा इतर कोणत्याही क्षेत्रात कार्य करत असाल तर तुम्ही कर्म करीत जा फळ तुम्हाला नक्कीच मिळेल.

गीतेमध्ये 'वर्ण' पध्दतीचे सुध्दा वर्णन आलेले आहे. जो ज्ञानी व शांत असतो तो ब्राम्हण तेजस्वी आणि शौर्यवान तो क्षेत्रीय जो कृषी व्यवसाय आणि गौरक्षण करतो तो वैश्य आणि सेवाभाव व्यक्ती हा शुद्र असे मानले जाते. वर्ण विभाजन हे त्याच्या योग्यता आणि कर्मानुसार होत असते.

राजनिती, कुटनिती, योग अभ्यास, आयुवेदिक, विज्ञान, जीवनामध्ये येणारे प्रत्येक संकटे आणि त्यांचे निवारण, वेद, शास्त्र, पुराण, ग्रंथ, इत्यादी सारख्या प्रत्येक क्षेत्राचे ज्ञान हे गीतेमध्ये श्री कृष्णाने अर्जूनाला सांगीतले व प्रत्येक क्षेत्राचे ज्ञान हे गीतेमध्ये सविस्तरपणे सांगीतले आहे.

श्रीकृष्णाने सांगीतले की इतर कोणत्याही धर्माचा अनादर न करता धर्म करावा. कोणत्याही धर्माचा सन्मान करावा. याच प्रकारे गीतेमध्ये अदभुत आणि ज्ञान भंडार आहे. जेवढे प्राप्त केले तेवढे अल्प आहे. गीतेचा काही अंशाश सुध्दा अभ्यास केला तरी व्यक्ती आपल्या जीवनामध्ये यशस्वी आणि श्रेष्ठ व्यक्ती बनू शकतो.

उज्वल विजय गावंडे
बी.कॉम.भाग– २

Scanned with OKEN Scanner

# * तारुण्यगाण *

युवक युवतींना मैत्रीपूर्ण मार्गदर्शन
सळसळतं तारुण्य हा प्रत्येकाच्या जीवनातला हवाहवासा टप्पा
उद्याची स्वप्न पाहण्यांच, मैत्री प्रेम सहवासात डुंबण्याचं
मुक्त जगण्याचं हेच वय
या टप्प्यावर जीवनाला भावी दिशा देणारे, रस्ते जसे भेटतात
तशीच आयुष्याला कडेलोट करणारी धोक्याची वळणंसुध्दा!
या निसरडया टप्प्यावर तरुणाईनं
आपला ताल आणि तोल कसा सांभाळावा
तारुण्याचे कल्लोळ कसे सावरावेत
याच एका अनुभवी तज्ञानं केलेलं, मेलांच मैत्रीपूर्ण मार्गदर्शन.

तारुण्य म्हणजे एक नादमय सुरावट असते त्याला एक लय असते. एक ताल असतो आणि एक आपला देखिल असतो तारुण्य म्हणजे आयुष्यातील एक बहारदार पर्व असतं. तारुण्य म्हणजे स्वप्नांच्या शिलेदारांचा एक धुंद आविष्कार असतो तारुण्य म्हणजे निर्बंध आकांक्षाचा एक कल्लोळ असतो विचारांना परिपक्वता यायला अजून वेळ असतो. आपण जगावर राज्य करण्यासाठीच जन्माला आलो आहोत. अशी अकल्पित भावना या वयात जन्म घेते मस्तकात एक प्रकारचा उध्दामपणा शिरु लागतो वयाने मोठया माणसांशी बोलतांना त्यांच्या विचाराला विरोध करणे त्यांच्या तत्वांची खिल्ली उडवणे प्रत्येक विधानाला प्रतिप्रश्न हे प्रकार वारंवार घडू लागतात.

मुलींमध्ये नव्यात नव्या फॅशनचे उत्तमोत्तम कपडे घालणे आवडू लागते केशरचना, चेहऱ्याची सौंदर्य प्रसाधने त्यांना आकर्षित करु लागतात. आपण चांगले दिसावे याचा सोस लागतो. आपले व्यक्तीमत्व चार चौघात उठावदार दिसावे हे साऱ्या युवतींना नव्हे युवकानांसुध्दा प्रकर्षाने वाटायला लागते

विचारांचा बंडपणा अर्थातच मुला–मुलींमध्ये समानच असतो, त्यामुळे वडीलधाऱ्या व्यक्तींची मते ते फक्त मोठे आहेत म्हणून का एकायची?अशी क्रांतिकारी आणि समाजातल्या गतानुगतीक व्यवहारांबाबतची प्रतिकूल प्रतिक्रीया देणे सुरु होते. आपण आता मोठे झालो आहोत. आपल्याला सारे कळते अशी भावना मनात नकळत वाढायला लागते.

या स्वप्नाळूपणात वास्तवातील शैक्षणिक गोष्टीकडे दुर्लक्ष होत जाते. अभ्यास करतांना एकाग्रता विचलीत होत राहते वाचलेले लक्षात राहत नाही. अभ्यास करायची स्फूर्ती येत नाही. आतापर्यंत चांगले असलेले विषय आता समजतच नाहीत म्हणून नावडते बनवतात अखेर अभ्यासात मागे पडणे किंवा वर्ष वाया जाण्यांची वेळ येते.

अभ्यासात दुर्लक्ष प्रगतीचा अभाव सतत नापास होणे अतिभित्रेपणा, न्युनगंड, मत्सरी–हिसंक प्रवृत्ती उध्दटपणा अक्रमक वर्तन अशा दोषामुळे हे युवक महाविद्यालयीन शिक्षणक्रमात अपयशी ठरतात. ठायी ठायी फक्त निराशाच त्यांच्या वाटयाला येते शैक्षणिक जीवनातल्या या अपयशामुळे चांगली नोकरी न मिळणे चांगला व्यवसाय करण्यांची संधी उपलब्ध न होणे याशिवाय काय होणार?सहाजीकच आपण जीवनात अपयशी किंवा कुचकामी बनल्याची टोच निर्माण होते. सुसाट पुढे आणि फक्त पुढेच धावणाऱ्या या स्पर्धात्मक जगात अशा वैफल्यग्रस्त तरुणांची संख्या वाढीस लागू शकते. तारुण्यात सहज घडणाऱ्या अशा घटनांमध्ये या युवकांना योग्य मार्गदर्शन न दिल्यास बेकार तरुणांची पिढी निर्माण होण्यांस वेळ लागत नाही.

उसळत्या संप्रेरकांमुळे तारुण्यात पदार्पण केलेल्या युवक–युवतीची मने सागराच्या भरती ओहोटीप्रमाणे अतिशय चंचल असतात साध्या गोष्टीमुळे प्रमाणाबाहेर राग येतो तर काही कारण नसताना एखादी गोष्ट किंवा एखादी व्यक्ती बेहद आवडून जाते. सिनेमा–टीव्हीवर दिसणारे हायफाय विश्व सत्य वाटू लागते आणि संगणकाच्या मायाजाळातील गोष्टीच विश्वासार्ह वाटू लागतात. युवतीच्या बाबतीत इतरांना दुखावणारे वर्तन वरचेवर घडू लागते. कित्येकदा रागाचा अतिरेक होऊन आदळ आपट करणे अचानक काही विध्वंसक गोष्टी करणे, मारपीट करणे अशा घटना व्हायला लागतात युवकांच्या बाबतीत मुलींवर कॉमेंटस टाकणे त्यांची चेष्टा करणे आणि प्रसंग मान मर्यादा ओलांडण्यांच्या घटना घडतात खूपवेळा तर या गोष्टी होऊन गेल्यावर त्यांना आपण असे कसे वागलो?याबाबत खूप पश्चाताप देखील होतो.

आज विभक्त कुटुंबपध्दतीत पालकांचा आपल्या मुलांबरोबर संपर्क खूप कमी झाला आहे. जर आई–वडील दोघेही व्यवसाय व नोकरी करणारे असतील तर मुला–मुलींची आर्थक गरज भागवणे त्यांना खाण्यापिण्याच्या गोष्टी कपडे आणि स्मार्टफोन, टी.व्ही, सिनेमा, आयपॅड, प्लेस्टेशन अशा नवनवीन गोष्टी उपलब्ध करुन देण्यापलीकडे काही कर्तव्ये पार पाडण्यांस त्यांच्या स्वत: च्या आयुष्यातील धडधकीमुळे वेळही नसतो आणि त्यामुळेच त्याबाबतीत सखोल विचारही होत नाही. आपला मुलगा अभ्यासाच्या वेळेत, शाळा–कॉलेजच्या वेळेत नक्की काय करतो हे या पालकांना पाहणे जमतही नाही किंवा असे काही आपला पाल्य करत असेल, असा विचारदेखिल त्यांच्या मनात येत नाही.



Scanned with OKEN Scanner

# ✽ तारुण्यगाण ✽

पालकांची ही कथा, तर दुसऱ्या बाजूला फक्त वर्गात जाऊन विषय शिकविणे म्हणजेच विद्यादान करणे अशा विचारांचा शिक्षकवर्ग मुलांना शैक्षणिक विषयाबरोबर जीवनातील चिरंतन गोष्टींचे ज्ञान देणे, त्यांच्या वागण्यातील आणि विचारातील त्रूटी त्यांना समजावून त्यांच्या जीवनाला उच्च विचारांनी आणि नैतिक आचारांनी समृध्द करणारा त्यांना एक चिरंतन दृष्टी देणारा त्यांच्या आयुष्यात त्यांना आदर्श मानावा असे अध्यापक आज खुप कमी सापडतात.

अशा प्रकारे संस्कारापासून वंचित, कुठलाही वाचक नाही आचार विचारांवर बंधन नाही असे युवक समाजातल्या घातक मोहापासून दूर राहूच शकत नाही. त्यांना बिडी–सिगारेट, पान–गुटखा, बिअर–दारु, लॉटरी–सट्टा–जुगार, अशा व्यसनात गुंतायला कितीसा वेळ लागणार?

थोडक्यात सावरले तर ठिक, नाहीतर त्यातून उदभवणारे गुन्हेगारी जगताशी संबंध या घसरगुंडीची जाणीव होईपर्यंत पूर्ण अध:पात होऊनही गेलेला असतो. कुंभारासमोर असलेल्या मातीच्या गोळयाला जर त्याने जाणीवपूर्वक योग्य आकार दिला तर अप्रतिम मुर्तीची निर्मीती होते. व्यासंगी शिल्पकाराच्या छिनीने पाषणातून देवत्वाची निर्मीती होते. परंतू त्या हातात कसब नसेल, तर त्याचे माकड व्हायला काय अवकाश?

प्रदिपकुमार नेमिचंद कुमावत
बी.कॉम.भाग– २

---

## गावातलं वडाचं झाड

गावातल्या कन्हाय ऐटायतलं वडाचं झाड त्या झाडाखाली दर रविवारी अत्तारी अन नभीभाई यायचं दुकान लागे. दाढी वाढलेली पांढरे फटक कपडे, पायजामा, गोल टोपी असा अत्तारी अन नभीभाईच्या अंगात सदरा. त्यांच्यावरुन चार खिसे असलेलं जाकिट. डोकश्यात गोल टोपी अस त्यायचं रायणीमान. अत्तारीच्या दुकानात कुकु, खोबरेल तेल, करदोळे अस सामान अन नभीभाईच्या दुकानात आरसे, कंगवे, रेबिना, पिना, कंपासपेटया, लेकरायचे खेळणे अस सामान. आम्हाले अत्तारीपेक्षा नभीभाईच्या दुकानाचं आकर्षण लय वाटे. काहून की, त्या दुकानात खेयणे रायत. हे दोघजणं मंगरुयहून घोडयांवर यायचे. मंग काही दिवसात शेवटी शेवटी ॲटोनं येत गावातले सारे लेकरं पोरीसोरी अन बायाधन त्यायले मामा मनायच्या दुकानाच्या भवताल पोऱ्यासोऱ्या खेयण्यासाठी लडणारे लेकरं, तेलासाठी फणीसाठी आलेल्या बुडयाबाडया यायची गर्दी व्हायची. मंधातच एखादया वयवय करणाऱ्या लेकराले नभीमामा धमकावायचा. त्याच्या धमकावन्याले लेकर लट भ्यायचे पान सुपारीचं एक लायनं गठूउच त्याच्या खिशात राहये. तथी पाच सहा बसलेले रिकामटेकडे त्यायच्याजवळून पान खायचे. झाडावर डोसक्याच्यावरे बसलेले पाखरं आरशाचाा उजीड पाडून उडवायचे ते आम्हाला गमतीच वाटे.

वडाजवळून कामाले जाणारी एखादी बाई अत्तारीमामाले मनायची, "मामा, माहयी पोरगी यील त तीले खोबरेल ते अन छटाक भर कुंकु देजा. पैसे पुढयच्या हप्ती देईन!" असं सांगून जायची कवा पैसे नाहीत म्हणून त्यायन कोनाले वापस पाठोल नाई. बाया–पोरी हे कवा कोण्या शहरातल्या दुकानात गेल्या नसतील पण त्यायले या वडाखालच्या दुकानात शहरातल्या दुकानाची आठवण येऊ दिली नाही. मी लहान होतो तवा नभाईजवहल्या पंधरा रुपयाच्या चेंछूसाठी रडत जाव. नाईत मले कंपास पाहयजे म्हणो. मगं माया मायनं मले वीस रुपयाचा कंपास घेवून दिला. कंपास महाग असूनच मले कंपासच कावून घेवून दिला त्याचा अर्थ आज समजला. बरं ते जाऊ दया! असे ते अत्तारी अन नभीभाई आमच्या सगळया गावाले अलग धर्माचे वाटले नाही. धार्मिक रागाचा, भांडणाचाा आमच्यावर परिणाम झाला नाही. जवळपास चाळीसक वरस ते आमच्या गावात आले. आता वयान थकले. त्याच्यानं त्यायनं येनं बंद केल. आजही दर रविवारी त्या वडाखालून गेलं की अत्तारी अन नभीभाई मामाची आठवण आल्याशिवाय राहयत नाही. अन ते वडाचं झाड आज एकटच वाट पाहयतांना दिसते.

कु कोमल विवेक टोपले
बी.ए.भाग– २

# सहकारातून ग्रामिण विकास

ग्रमिण भागांचा विकास भारत

भारत हा खेडयांचा देश आहे. भारतात बहुसंख्या जनता ही ग्रामिण भागात राहते. ग्रामिण विकासामुळे देशाच्या विकासाला गती प्राप्त होते. ग्रामिण भागात शेती व शेतीशी निगडीत व्यवसाय उद्योगात अनेक लोक गुंतलेले असतात ग्रामिण भागातील लोकांचे उत्पन्न वाढणे गरजेचे आहे. यासाठी सहकारी संस्थाची गरज भासते. बहुउद्देशिय सहकारी संस्था स्थापन करुन शेतकरी, कारागीर, अन्य व्यवसायीक यांना पतपुरवठा करुन त्याचें उत्पन्न वाढविता येते प्राथमिक पतपुरवठा संस्था, सहकारी साखर कारखाना यामुळे ग्रामिण भागाचा विकास होतो. ग्रामिण भागाचा विकासामुळे देशाच्या विकासांला चालना मिळते.

रोजगार वाढ

सहकारामुळे शेती क्षेत्राबरोबर प्रगती होते. वाहतुक, बॅकीग, विपनन, ग्राहक, प्रक्रिया इत्यादी सेवा क्षेत्रातही सहकारी संस्था स्थापन करता येत असल्याने मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती होते. सहकारी साखर कारखाने, सहकारी सुत गिरण्या, सहकारी भात गिरण्या, तेल गिरण्या, इत्यादी संस्थांमध्ये मोठया प्रमाणात रोजगार निर्माण होते. ग्रामिण भागातील तरुणांना रोजगार मिळाल्याने बेकारीची समस्या कमी होते.

बचतीत वाढ

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या शाखा खेडोपाडी कार्यरत आहेत या बॅंका ग्रामिण भागातील लोंकाचा शिलकी पैकी बचत खाते उघडून जमा करतात. त्यामुळे शहरी जनतेला बचतीची सवय लागते. या बचतीमुळे देशातील भांडवल निर्मितीस चालना मिळते. परिणामी देशांतील भांडवली गुंतवणूक वाढून देशाच्या आर्थिक विकासाला गती प्राप्त होते. वाजवी किंमतीत वस्तूचा पुरवठा सहकारी संस्थांमुळे ग्राहकांना जीवनाश्यक वस्तू स्वस्त दरात उपलब्ध होतात. ग्राहक सहकारी संस्था या थेट उत्पादकाकडून माल खरेदी करुन ग्राहकांना विकतात. मोठया प्रमाणावरील खरेदीने खर्चात बचत होते. वाहतूक खर्च कमी होतो. इतर खर्चही कमी होतात. उत्पादक घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी, फिरते व्यापारी, ग्राहक अशी वस्तू वितरणाची साखळी असते. ग्राहक सहकारी संस्थामध्ये मात्र अध्यक्ष व व्यापाऱ्यांची साखळी वगळली जाते. परिणामी उच्च दर्जाचा माल ग्राहकाला स्वस्तं किंमतीमध्ये उपलब्ध होतो.

शेत मालाला योग्य किंमत

शेतमालाला योग्य किंमत मिळवून देण्यांसाठी सहकारी संस्थांची नितांत गरज आहे. शेतकरी एकत्रित येवून आपल्या उत्पादीत शेतमालाची विक्री करण्यांसाठी विपनन सहकारी संस्था स्थापन करतात अशी संस्था सभासद शेतकऱ्यांना शेतमालाला योग्य किंमत मिळवून देते. सभासद शेतकऱ्याकडून शेतमालाची खरेदी करुन ग्राहकांना पुरविण्यांचे कार्य करते शेतकाऱ्यांना लागणारी विविध कार्य :— उदा. मालाची एकत्रीकरण, वर्गीकरण, प्रतवारी, बांधणी, साठवून, वाहतूक, इत्यादी कार्ये सहकारी विपनन संस्थाच करते. तसेच बाजारातील मागणीप्रमाणे मालाचा पुरवठा ही करते. परिणामी शेतमालाला चांगली किंमत मिळवून सभासद शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते.

कु नेहा बबन आसोले
११ वी कला



Scanned with OKEN Scanner

# ※ जसे विचार तसा माणूस ※

माणसाला यशस्वीरित्या जीवन जगण्यासाठी विचारांची आवश्यकता असते. विचार हे दोन प्रकारचे असतात सकारात्मक आणि नकारात्मक किती विरोधकास आहे. यामध्ये! जीवन हे सुखा दुख:ने भरलेले आहे. हा नकारात्मक विचार, तर या खाचखळयांना पार केल्यानंतर सुखाच सुंदर गाव येणार आहे. हा सकारात्मक विचार. वाईट परिस्थितीतही संधी शोधणे, प्रयत्न करणे हे यशस्वी होण्यासाठीच पहिल पाऊल ठरत. फक्त हे पाऊल उचलून टाकायची गरज असते व त्यासाठी आवश्यक असते विचाराचे साकारात्मक असणे.

यासाठी उदाहरण म्हणून सांगते तुम्ही जर एखादा गाणित सोडविता येणाऱ्या व गाणित न सोडविता येणाऱ्या अशा दोन विद्यार्थ्यांमधील नेमक्या फरकाचे जवळून निरीक्षण केले तर तुम्हाला दिसेल की या दोघांमध्ये जास्त फरक नाही. तुमच्या लक्षात येईल की, ज्याला गाणित सोडविता येतो तो काही पराक्रम वगैरे करत नाही. फक्त इतकाच की त्याला वाटतं आपण गाणित सोडवू शकतो आणि ज्याला गाणित सोडविता येत नाही त्याला वाटतं आपल्याला येत नाही. आता ज्याला गाणित सोडविता येते त्याने जर काही दिवस गाणित केले नाही आणि काही दिवसांनी गाणित सोडवायला बसला तर आता त्याला नव्याने गाणित सोडवायचे शिकवावे लागणार नाही कारण त्याला एकदाच कळलेल आहे की, मी गाणित सोडवू शकतो या उदाहरणा वरुन असे लक्षात येईल की, माणुस जसा चिवार करतो तसाच तो घडतो सुध्दा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी असे म्हटले आहे की,.......

"जरी मी हिंदू धर्मात जन्माला आलो, तरी मी हिंदू म्हणून मरणार नाही." या उदाहरणातून बोध घेऊन आपणही ठरवायला पाहिजे की,.... "ज़री मी गरीब कुटूंबात जन्माला आली, तरी गरीब म्हणून मरणार नाही." कारण हा स्पर्धा परिक्षेचा प्रवास आहे. या प्रवासातून सर्वानांच जावे लागते. मग तो श्रीमंत असो किंवा गरीब! स्पर्धा परिक्षा एक माध्यम आहे, आपण ठरविलेले स्वप्न पूर्ण करण्यांचे त्यासाठी सर्वप्रथम आपल्याला काय साध्य करायचे आहे. ते ठरवावे व नियोजनपूर्वक अभ्यास करुन ठरविलेले स्वप्न पूर्ण करावे. म्हणून मला असे म्हणावेसे वाटते की, "आपण मन:स्थिती बदलायला पाहिजे, परिस्थिती आपोआप बदलेलच"

आपले मार्ग
आपणच आखित असतो
आपलं भविष्य
आपणच रेखित असतो.
थांबायच कुठ?
हे आपणच ठरवित असतो,
आपल्या चित्रात रंग, आपल्याला भरायचे असतात,
ठरवलेले डाव
आपल्यालाच जिंकायचे असतात
कारण ....... हारतांना
आपल्यालाच रडायचं असतं,
आणि जिंकल्यानंतर आपल्यालाच हसायचं असतं,
आम्हाला नेहमी पुढेच जाण्यांची प्रेरणा अशीच मिळत राहावी हीच अपेक्षा !

कु नंदीनी भगत
१२ वी कला



Scanned with OKEN Scanner

# * संत तुकारामांच्या अभंगातील सामाजिक मूल्ये... *

संत तुकारामांच्या अभंगाने १६ व्या शतकामध्ये समाजाला दिशा दिली आज सुध्दा त्यांची अभंगवाणी अखंडपणे आपणांस मोहित करते, उपदेश करते. तुकोबांनी आपल्या अभंगातून जी सामाजिक मूल्ये सांगीतली आहेत, ती पुढील प्रमाणे —

१) समता :—

तुकारामांनी श्रेष्ठ—कनिष्ठ, स्पृश्य—अस्पृश्य, उच्च—निच या भेदांना नाकारले जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था समाजातील कर्मठांनी निर्माण केली हे त्यांनी सांगीतले त्यांनी जातीभेद नाकारला.

"उच्चनिच काहे नेणे भवंत। निष्ठे भाव भक्त देखोनिया।।" असाही त्यांचा एक अभंग प्रसिध्द आहे.

२) परिश्रम

कुठलीही गोष्ट परिश्रमशिवाय प्राप्त होत नाही. लौकिक व्यवहारात जगतांना कष्टाशिवाय काही पर्याय नाही.

"साहोनिया टाकी घावे। पाषाण देवची जाला पाहे।।"

आकीचे घाव सहन करून दगडातूनं मुर्तीची निर्मिती होते. तसेच कुठलेही कार्य करावयाचे असल्यास परिश्रम घ्यावेच लागतात. निष्क्रिय असणे मृत झाल्याचा पुरावा समजावा, असे तुकोबांना सूचवायचे आहे.

३) पर्यावरण रक्षण :—

"वृक्षावल्ली आम्हां सोयरे, वनचरे। पक्षीही सुस्वरे आळपिती।।
आकाश मंडप पृथ्वी आसन। रमे तेथे मन क्रिडा करी।।"

तुकोबांच्या अभंगातून पर्यावरणाच्या संतुलनाचे मूल्य व्यक्त होत आहे.

४) रंजल्यांची सेवा—ईश्वर सेवा :—

या समाजात जे दिन आहेत, दुःखी कष्टी आहेत त्यांचीच सेवा करण्यातच ईश्वरसेवा आहे हे व्यापक जाणिवेचे सामाजिक मूल्य तुकोबांनी व्यक्त केले आहे.

"जे का रंजले। त्यांसि म्हणे जो आपुले।।
ते चि साधु ओळखावा। देव तेथेची जाणावा।।"

देवाचे अस्तित्व मंदिरात शोधण्यापेक्षा रंजल्या—गांजल्यांच्या सेवेतच शोधायला पाहिजे असे तुकोबांनी सांगीतले आहे. त्यांची सेवा हीच ईश्वरसेवा असे त्यांनी प्रतिपादन केले आहे.

५) उत्तम व्यवहार :—

"जोडोनिया धन उत्तम व्यवहारे। उदास विचारे वेच करी।।"

लौकिक जगात व्यक्तीचा व्यवहार हा उत्तम असला पाहिजे. यावर तुकोबा भर देतात.

६) कंटकांचे निर्दालन :—

"दया तिचे नाव भूतांचे पालन। आणिक निर्दालन कंटकांचे।।"

प्राणिमात्रांवर प्रेम करणे ही तर दया आहेच, परंतू या जगात जेवढे समाजकंटक असतील तेवढयांचा नायनाट केला पाहिजे, असाही उपदेश तुकोबा करतात.

७) भोंदूगिरीवर हल्ला :—

दृष्टवृत्तीचे लोक समाजाला लुटतात. हे भोदू सामान्यांना आपल्या जाळयात ओढून त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना दास बनविणाऱ्या अशांचा तुकोबांनी निषेध केला व त्यांच्या कडून ते प्रहार करतात.

"लांबवूनि जटा नेसोनि कासोटा।। अभिमान मोठा करिताती।।
ऐसे कैसे झाले भोंदू। कर्म करोणी म्हणती साधू।।
होऊनी संन्यासी भगवी लुगडी। वासना न सोडी विषयाची।।
ऐसे पोटभरे संत। त्या कैचा भगवंत।।"

८) नैतिक आचरण :—

नैतिकता हा धर्माचा पाया आहे. तुकोबांनी हे मर्म लक्षात घेवून समाजातील सामान्य माणसाला नैतिकतेचे पाठ आपल्या अभंगातून दिले आहेत.



Scanned with OKEN Scanner

"चित्त शुध्द तरी शत्रू मित्र होती ।
व्याघ्र हे न खाती सर्प तया ।।"

९) सत्याचा स्वीकार :–

सत्य हे मुळातच स्वयंप्रकाशित असते. सत्याला सोंग घ्यावे लागत नाही हे अनेक उदाहरणांवरुन त्यांनी आपल्या अभंगात स्पष्ट केले आहे.

"न लागे चंदना सांगावा परिमळ । वनस्पती मेळ हाकारुनी ।।"

१०) नम्रता :–

कोणत्याही गोष्टीच्या प्राप्तीसाठी तुकारामांनी कष्ट करायला सांगीतले आहे. कष्टांबरोबरच आपल्यामध्ये नम्रताही असली पाहिजे. तरच मिळविलेली वस्तू, गोष्ट आपल्याजवळ शोभते.आजच्या प्रचंड धकाधकीच्या, आपमतलबी जगात व्यक्तीला समाजाभिमुख करण्यांसाठी, त्यांच्यात सामाजिक मूल्यांची रुजवणूक करण्यांची ताकद तुकोबांच्या अभंगात आहे. म्हणून तुकोबांच्या अभंगाचे पठण, चिंतन, मनन व्हावे आणि ते आचरणात आणण्यासाठी व्यक्तीची धडपड असावी.

प्रा.डॉ.एस.ए.राठोड
(मराठी विभाग)

---

# गरीबीच्या माध्यमातून शिक्षणाची अवड

माये ग माये, माये ग माये नको तोडू माझी शाळा ......!
लय लय शिकूनी मोठ व्हायचं मला
माये ग माये, माये ग माये । बाप दारु प्यायला पैसे तुला मांगतो
पन माझा खर्च मीच करीन हे मी तुला सांगते।
गरीबेच्या पोटी नको तोडू माझे शिक्षण
आज न उद्या करीन मी या देशाचे रक्षण।
दिवसरात्र एक करीन देते मी तुला वचन
लहानशा त्या बहीण–भावाला खेळवीन मोया बंगल्यातन
सेवा करते तुझी मी मोया या स्वत:च्या भरोशावर
नको ठेवू दगड गरीबंचा मोया काळजावर।
भावाच्या त्या आजारासाठी पैसे आणिन मी कुठून
फक्त मला धिर हवा तोया मनातून
तुला वाटत असेल जाईन पळून
पण तोया छायेची हतकळी आहे मोयाशी जोडून ।
नको घाबरुस तु ठेव मोयावर भरोसा
शिक्षणाच्या पोटी होईल फक्त खर्च पैसा
स्वत:च्या हिंमतीवर करीन घराचा उध्दार
अस छाती ठोकून सांगते । नेहमी देवापाशी मागते ।

सुरज म. कावरे
वर्ग बी.कॉम.भाग– १



Scanned with OKEN Scanner

## ✻ शिक्षण मी कस घेऊ ! ✻

सांगा सांगा मास्तर मी शिक्षण कस घेऊ ।
का जिंदगीभर माय राहिली तशीच मी राहू ।
बारावीझाली अंदा आली मी पहिली ।
पण बोर्डात याची इच्छा मायी अधुरी राहीली ।
का आता पुढच्या शाळेच सपनबी नाही पाहू ।
सांगा सांगा मास्तर मी शिक्षण कस घेऊ ।
बारावीमध्ये असतांना माया लग्नाच्या गोष्टी झाल्या सुरु ।
अगवचे नातेवाईक सोयरिका घेवून घरी येऊ येऊ लागले मरु ।
सांगा या वातावरणात कशी पुडे जाऊ ।
सांगा आता मास्तर मी शिक्षण कस घेऊ ।
मोठा भाऊ म्हणे मुक्त मध्ये दयाटाकून आता
शिकवा लागत नाही म्हणे काही ।
ते स्वत: १० बीच आहे तीन खेप फेल
त्यालेच येलाले बेल येत नाही ।
कशी मायी जिंदगी मी माया स्वप्नात नेऊ ।
सांग आता मास्तर मी शिक्षण कस घेऊ ।
कॉलेजमध्ये जातांनी वाया जायेल काट्टे
फिरते मांग त्याच्या गाडया घेऊन ।
अन थुका वाटते तोंडावर
त्यांचे वंगयले थुतर पाहून ।
किती दिवस राहू अस भिवू भिवू
सांगा आता मास्तर आम्ही शिक्षण कस घेऊ !
बाप आहे पाठमांग उभा तु शिक म्हणते पोरी ।
खंदते बिचारा गटार अन उपसते मोरी ।
त्याचे हे येले पाहून कसा जीव माया टूटू नाही देऊ
सांगा आता मास्तर मी शिक्षण कसं घेऊ ।

रुपेश भ पाचे
बी.कॉम.भाग– १

---

## ✻ उदया कोणी पाहिला ✻

हे तरुण रात्र तुला पाहू दे मन भरुनी आज
काय माहित कोण जाणे, उदया कोणी पाहिला !
तु उधळ गं तुझे रंग, आकाश भरुन
साठवूदे आजच ते ही डोळयात कायमचे
काय माहित उदया कोणी पाहिला !
तु दावतेस आशा मला, परत पाहण्यांची उदया
पण काय सांगू तुला, त्या विधात्याच्या मनातला डाव कोणी पाहिला !
होना ग तु तरुण अजून, तुला आज डोळयात साठवू दे
एवढीच इच्छा माझी तू पूरी आज होवू दे !
तु उधळ तुझे रंग मी बघायला तयार आहे.
जरी सगे सोयरे माझे, निद्रेत घायाळ आहे
काय माहित उदया कोणी पाहिला?
ए चांदणे ग, मला तु, खुणवतेस अशी

बोलाव न त्या तुोया सोबत्याला
का तोही गेला तुला सोडून आज
मोया.... मोया... लाडक्या प्रिये सारखा
परत येण्याच आश्वासन देवून
''उदया'' ची आशा दावून !
माझी उदया आज संपण्यावर आली गं
म्हणून पाहतोय तुला आज मोया
प्रियेच्या रुपात, शेवटी काय माहित कोण जाणो
उदया कोणी पाहिला .......

चंद्रकांत माणिकराव ढंगारे
बी.ए.भाग– १

---

# दुनिया झाली गर्विष्ठ !

नदित किंवा तलावात अघोंळ, करायला लाज वाटते,
आणि स्विमींग पूल मध्ये
पोहायला फॅशन वाटते
गरिबाला एक रुपया दान, नाही करु शकते,
आणि वेटरला १० रु. टिप
देण्यांत मोठेपणा वाटते
पंक्तीत बसून जेवणे ही, जूनी पध्दत वाटते,
आणि खाण्यासाठी रांग
लावणे मजा वाटते.
बहिण काही मागत असेल तर
फालतू काही मागत असेल तर
आणि प्रेयसीच्या मागण्याला
नसीब मानला जाते.
गरिबाकडून भाजीपाला घेण्यांत, लाज वाटते,
आणि शार्पींग मॉल मध्ये
आपला खिसा रिकामा
करण्यांत गर्व वाटतो.
आपला कुटूंब आपल्याला
शिकविण्यासाठी राबराब राबते,
आणि आपल्याला महाविद्यालयाच्या
पटांगणात प्रेड ऑफ करुन
फिरायला मजा वाटते.
आपल्या इज्जतीवर कोनी, डोळे उगारले तर आपल्याला राग येते,
आणि दुसऱ्याच्या निलाम झालेल्या इज्जतीवर
आपल्याला हसू येते.
कसा आलास तू कसा जाशील
हे कोणाला माहित सुध्दा पडणार नाही,
तुला मृत्यु येईल तेव्हा,
तुझी आठवण सुध्दा राहणार नाही.
जीवन अमुल्य आहे, हसता हसता जग
अभिमान बाळगू नकोस
म्हणूनच सांगतोरे मानवा गर्व कधी करु नकोस

राजेश विनोद जाधव
बी.ए.भाग– १

## महाविद्यालयीन प्रेयसीचा सहवास

रोज कॉलेजला जातांना, नजरेला नजर देतेस
मी डोळेमारुन पाहील की, नजर चोरत असतेस
मी काही विचारल की, ओजल भरुन बसतेस
मी जातो म्हटल की, थांबाना जरा म्हणतेस
खर प्रेम करतेस का मोयावर
की फक्त मला मित्र मानतेस !!

रोज येता जाता वाटेवर
मला मध्येच आडवतेस
तोयाशी काही बोलायच म्हणत
बोलतांना मध्येच अळखळते
मी बोलायला लागलो की
तु फक्त मोयाकडे पाहतेस
किती छान बोलतेस रे तू
म्हणून माझ कौतूक करतेस
खर प्रेम करतेस का मोयावर
का फक्त मित्र मानतेस !!

कॉलेजची सुट्टी झाली की, गेटवर माझी वाट पाहत थांबतेस
मी येतांना दिसलो की, नजर दुसरीकडे वळवतेस
मी जवळ आलो की, जणू मुकीच होवून जातेस
मोयाशी बोलायच असतांनाही, मुद्दाम गप्प राहतेस
खर प्रेम करतेस का मोयावर, की फक्त मला मित्र मानतेस !!

राजेश विनोद जाधव
बी.ए.भाग–२

---

## कविता

विजेला आज जरी मी हा मजा अंत नाही
पेटेन पून्हा उद्या नव्याने सामर्थ्य नाशिवंत नाही
छाटले जरी पंख माझे पून्हा उडेल मी
छाटले जरी पंख माझे पून्हा उडेल मी
अडवू शकेल मला अजून अशी भींत नाही
माझी झोपडी जाळण्यांचे केलेत कैक कावे
पण जळेन झोपडी अशी ती आग ज्वलंत नाही
रोकण्यांस वाट माझी वादळे होतील अतुर
डोळयात जरी गेली धुळ थांबण्यांस उसंत नाही
येतील वादळे खेटतील तुफान तरी वाटत चालतो
अडथळयांना भिऊन अडखळने पाऊलास ऊसंत नाही
विजेला आज जरी हा मजा अंत नाही
पेटेन पून्हा उद्या नव्याने सामर्थ्य नाशिवंत नाही.

राहूल नंदू कुटे
बी.कॉम.भाग– १

# माझी लेक

पोरीची पसंती आली की, बापाच काळीज धडधडत
चिमणी घरट सोडणार म्हणून
आतल्या आत खुप रडतो
हसरे खेडकर बाप एकदा
धिर हे गंभिर दिसत
पोरीला पाणी मागण्यापेक्षा
स्वत: च उठून घेवू लागतो
या घरातला चिवचिवाट अचानक थांबणार असतो
म्हणून बाप लेक झोपल्यावर
तिला पाहून रडत असतो
अंबूच्या निंबूच्या करत
मोठी कधी झाली कळलच नाही
बाप सांगतो तिला सोडून पाणी गिळतच नाई
दिवसातून एकदा मायेने जवळ घ्याव वाटते
परक्याच धन असल तरी
दयायला मात्र नको वाटते
उठल्यापासून झोपेपर्यंत बापाची
काळजी घेत असते
आज ना उदया जाणार
म्हणून पोरगी जास्त लाडकीच असते
पोरगी जाणार म्हटल की जास्तच तुटतो
कळत नाही बैठकीतून
अचानक का उठून जातो
इकडे–तिकडे जावून गुपचुप डोळे पुसत असतो
लेकिच कल्यान झाल म्हणून
पून्हा बैठकित हसत असतो
तिच सगळ जीवन पलटून
क्षणाक्षणाला आढवत असतो
डोळया देणाऱ्या आसवांना
बाबा वापस साठवत राहतो
बापाची गोळी घेतली का
आता कोण विचारेल ग !
जास्त गोळ खावू नका
असा कोण कशाला दाटिल ग !
बाबा कोणाच ऐकत नाई
पण पोरिला नाकार देत नाही
एका अर्थाने पोरगी काळजी
करणारी आईच असते
पोटाचा गोळा देण्यांची कहाणी, फार विखरी आहे........

कु.वैष्णवी राजेश लुंगे,
बी.ए.भाग– १

## लढ ! म्हणा

ओळखलंत का सर मला
पावसात आला कोणी कपडे होते कर्दमलेले
केसावरती पाणी क्षणभर बसला
नंतर हसला बोलला वरती पाहूण गंगामाई पाहूणी
आली गेली घरट्यात राहून माहेरवाशीन
पोरीसारखी चार भिंतीत नाचली
मोकळया हाती जाईल कशी
बायको मात्र वाचली
भिंत खचली चुल विझली
होते नव्हते गेले प्रसाद म्हणून पापण्यामध्ये
पाणी थोडे ठेवले कारभारनीला घेऊन संगे
सर आता काढतो आहे चिखल गाळ काढतो आहे.
पडकी भिंत बांधतो आहे खिशाकडे हात जाताच
हसत हसत उठला पैसे नकोत सर
जरा एकटेपणा वाटला मोडून पडला संसार
तरी मोडला नाही कारण पाठीवरती हात ठेवून
फक्त लढ ! म्हणा.....

कु विशाखा अनिल म्हस्के
बी.कॉम.भाग— ३

---

## दमलेल्या बापाची कहाणी

कोमेजून निजलेली एक परि राणी, उतरते तोंड डोळा सुकलेले पाणी
रोज तेच आहे सारं आज काही नाही, माफी कशी मांगू पोरी मला तोंड नाही
झोपतच घेतो तुला आज मि कुशीत, सांगायची आहे मोया सानुल्या फुला
दमलेल्या बाबाची ही कहानी तुला .....१
आटपाट नगरात गर्दी होती भारी
घामा घुम राज करी लोकलची वारी, रोज सकाळीच राजा निघतांना बोले
गोष्ट सांगायचे काल राहूनिया गेले, जमलेच नाही काल मला जरी
आज पोरी येणार मी वेळेवरच घरी, स्वप्नातल्या गावांमध्ये मारु नग फेरी
खऱ्या परीसाठी गोष्ट चाचली खरी, घालीन मी तुला थकलेल्या हातांचा झुला
सांगायची आहे मोया सानुल्या फुला
दमलेल्या बाबाची ही कहानी तुला....२
उदळत खिदळत बोलशिल काही, बघतांना भान मला उरणार नाही.
हसुनिया उगाचाच ओरडेल काही, दुरुनच आपल्याला बघणारी आई
तरी सुध्दा दोघेजन दंगामारु आता, क्षणाक्षणावर देऊ खोडकर ढसा
सांगायची आहे मोया सानुल्या फुला, दमलेल्या बाबाची कहानी तुला ....३
खुशी माझी सांगत आहे ऐक बाळा काही
सदोदीत जरी का मी तोयापाशी नाही
जेऊ खाऊ नाऊ माकु घालतो तुला



Scanned with OKEN Scanner

कोमेजून निजलेली एक परि राणी,
उतरते तोंड डोळा सुकलेले पाणी
आई परी पानी वेणी करतो ना तुला
तुझ्यासाठी बाबा सुध्दा आहे खुळा
तरी सुध्दा गुपचुप रडतो रे बाळा
सांगायची आहे मोठ्या सानुल्या फुला
दमलेल्या बाबाची कहानी तुला.....४
असा गेले आहे बाळा कुऱ्हाडकुन
हल्ली तुला झोपेतच पाहतो दुरुन
असा कसा बाबा देव लेकराला देतो
लवकर जातो अन उशीरानं येतो
बालपण गेले तुझे तसे निटून
उरे काय तुझ्या मोठ्या ओंझळी मधुन
जरी आदी तुझ्या मोठ्यासाठी
जरी तुला काही अनोळखी दिसे हेस
तुझ्या जगातून बाबा हारवेल कागं
मोठेपणी बाबा तुला आवडेल का गं
सासुराला जाता जाजा उबंरठयामध्ये
बाबासाठी येईल का गं पाणी डोळयामध्ये
सांगायची आहे मोठ्या सानुल्या फुला
दमलेल्या बाबाची कहानी तुला .....५

कु धनश्री रेवानाथ पातुरकर
बी.कॉम.भाग– ३

---

## माझे बाबा

आज वाटल मला, थोडं बाबांवर लिहाव,
जमत की नाही त्यांना, शब्दात मांडण हेच पहावं

आयुष्यभर केले बाबांनी, सर्वांसाठी कष्ठ,
सहजासहजी मिळाली, नाही त्यांना कोणतीही गोष्ट

कुटुंबातील सर्वांवर, आहे त्यांची फार माया,
घरातील प्रत्येकांवर त्यांनी, धरली संसाराची छाया
त्यांना आयुष्यातील, प्रत्येक संकटावर सहज उत्तर सुचल,
आजच्या काळातही त्यांनी, आपल्या कुटुंबाला एकत्र जपल

आज त्यांच्यावर लिहीतांना, होत आहे हर्ष,
असे माझे बाबा आहेत, मोठ्यासाठी आदर्श

कु भाग्यश्री हरीओम लुगे
बी.ए.भाग– १



Scanned with OKEN Scanner

# देशाने स्पर्धेत तरुणाई विकली

कसल्या शाळा भरवता...
विद्यार्थी राहीलेत कुठे आता
अपेक्षांच्या ओझ्यासंकट
मुलांना जन्म देते माता, अशीच जर का
कोवळी फुले ऊमलण्याआधी सुकली
खरचं देशाने स्पर्धेत तरुणाई विकली

केव्हाचं विकली विधा
स्पर्धाच उरली सध्या
जगणं शिकवणं विसरले शिक्षक
विद्यार्थी दप्तरासाठीचाच पेंधा, अशीच जर का
पानं वाढण्याआधीच पिकली
खरचं देशाने स्पर्धेत तरुणाई विकली

गुजरले खेळाचे दिन
विरले रम्य बालपण
पुस्तके स्वप्नात दिसतात
परिक्षेत उरतो फक्त 'पण', अशीच जर का
पोरं शाळेत फक्त पुस्तकाचं शिकली
खरचं देशाने स्पर्धेत तरुणाई विकली

के.जी. पासून पदवीपर्यंत
जो तो बुध्दीचा पाहतो अंत
जिवघेण्या स्पर्धेत मुलगा
आधीपासूनच मरतो पण संथ–संथ, अशीच जर का
ज्ञानार्जना ऐवजी विधा दबावाखाली झुकली
खरच देशाने स्पर्धेत तरुणाई विकली....

शाळेपाठी हवी संगळयानाच नोकरी
बंगल्यात गाडी नि गोरी छोकरी
मिळणारे आनंदात जगतात
बाकीच्यांच्या जीव घेते बेकारी, अशीच जर का
आई–बापाच्या स्वप्नपूर्तीत पोरं थकली
खरच देशाने स्पर्धेत तरुणाई विकली....

कुठे थोड गणित चुकल कि
पायरीचं चुकते भविष्याची
समजून कोण घेतो आम्हा
शेवटी होळी करतो आयुष्याची, अशीच जर का
गळपासाची दोरी तुम्हीच हाती दिली
मग नक्कीच सारं जग म्हणेल
या देशाने स्पर्धेत तरुणाई विकली.....

कु अश्विनी सुरेश वंजारे
बी.कॉम.भाग– २



Scanned with OKEN Scanner

# सेंटर

खट्ट खाय भाकर, काई करु नको फिकर
घाबरासारखं काही कारण नाही, सेंटर आपलाच हाय ना बाई
इकडून शिवले तिकडून शिवले चारपाच खिशे
रस्त्यानं जाताना म्हणत लोक तिले पिसे, मदत करु का म्हणे अंबादास भोई

पेपर आहेत तुये त खुष हाय पोट्टी नी मानस
तोया नजरेत येण्यांसाठी हाच त आहे चान्स
तुले का या दयासाठी गावातून निघे टोईच्या टोई

निकाल लागला तिचा तिचा पहिला दर्जा
तिच्याच यशाची गावभर चर्चा, बाप सांगत सुटला गावभर
मा पोट्टी सारखं हुशार कोणी नाही

पोट्टीचं यश पाहून, बाप झाला खुश
स्वत:ले समजे जॉर्ज बुश, पेडे वाटायची त्याले लय झाली घाई

सेंटर गावात झाला बाईचा सत्कार, हेडमास्तर म्हणजे यात काय चमत्कार
वर्ष झालं बाईन अभ्यासशिवाय दुसरं काहीच केलं नाही

कु.दामिनी शिवनाथ गुप्ता, बी.कॉम.भाग १

---

# माणसाचा जन्म कशासाठी ?

ज्यांनी तुमचा struggle पाहिलायं फक्त त्यानांच तुमच्या यशाची खरी किंमत कळते इतरांसाठी ल्वन तम रनेज सनबाल चमतेवद कसं जगावं?

मनुष्य गरीब असला की लोक म्हणतात पैसे कमवायची अक्कल नव्हती त्यामुळे ४ पैसे कमाऊ शकला नाही. श्रीमंत असला की म्हणतात दोन नंबरचा पैसा आहे. त्याशिवाय आजकाल कुणी श्रीमंत होत? पैसाच्या मागे धाऊ लागला की म्हणतात पैसाची हौस उडली आहे. पैसाचा जीवनात महत्व दिले नाही तर म्हणतात त्याच्या जीवनात काही महत्वकांक्षाच नाही. नुसतेच पैसे कमवले आणि खर्च न करता साठवून ठेवले तर कवडी चुंबक म्हणतात.

चैन केली आणि जरा पैसा खर्च केला तर लागेच उधळया म्हणतात वाडवडीलांची संपती मिळाली तर त्याचेही सुख लोकांना पाहावत नाही लागेच त्याना बघना बघा कसा बसलाय आयत्या बिळावर नागोबा आयुष्यात काहीही करुन पैसे कमवले तरी टोमणे काही सुटत नाही म्हणतात काय उपयोग आहे त्याच्या आयुष्याचा?नुसता पैसाच्या मागे धावतोय पण सुख उपभोगायला वेळ नाही असं आंयुष्य काय कामाचं? जास्त भांविक असला तर म्हणतात. ' मनी नाही भाव, देवा मला पाव' आणि मदिरात नाही गेला तर नास्तीक म्हणतात. तारुण्यात अकाली मृत्यु आला तर हळहळतात अरेरे! फार लवकर गेला त्यांच भविष्य उज्वल होत दिर्घायुषी झालात तर तेच लोक म्हणतील अजून किती दिवस सरकारी पेन्शन खाणार?कुणास ठाऊक?

मनुष्य तब्येतीने बारीक असला तर झुरळ म्हणतात जाड असला की हती म्हणतात बारीक माणूस दिसल्यावर म्हणतात की तुोयाकडं पाहिले ना कि देशात दुष्काळ पडलय असं वाटतय जाड मनुष्य बघितल्यावर म्हणतात हा दुष्काळ ना असल्या माणसामुळेच पडतो.

सहज कुणाला तरी मदत केली तर म्हणतात यामागे नक्कीच काही तरी हेतू असणार नाही मदत केली तर म्हणतात साधी माणूसकी नाही बघा! सरळ—साधा असेल तर म्हणतात अंगात थोड तरी स्वार्थ असाव स्वार्थी असलाच तर म्हणतात माणसाचा स्वभाव सरळ असावा स्वार्थ्याची संपत्ती काय कामाची? खेळकर स्वभाव असला तर म्हणतात आचरट आहे. परिस्थितीच गांभिर्य नाही आणि गंभरी असणेही त्याला रुचत नाही. म्हणतात हसण्यांची ऐलर्जी आहे याला कुणीतरी जवळ येईल का याच्या?तुम्ही यशस्वी झालात तरी त्यांना अडचण होते म्हणतात आमचा ऐकल्यामुळे यशस्वी झालात अयशस्वी झालात तर म्हणतात आमचं ऐकलं नाही ना मग भोगा कर्माची फळ लोकांच काय घेऊन बसलात हो काहीही केलंत तरी त्याला नावे ठेवण्यांची त्यांना सवय असल्याने त्यांच म्हणणं किती मनावर घ्यायचं? जग काय म्हणेल याची परवा करत आपलं जीवन का नासून घ्यायचं?

हिन्दीत एक सुपिसिध्द म्हण आहे— '' क्या कहेंगे लोग?यह है सबसे बडा रोग''

आयुष्य जगतांनाविचारपूर्वक निर्णय घ्या आणि जाणीवपूर्वक जगायला शिका, माणसांच्या या अनोळखी प्रदेशात स्वत:ला वेळ द्या स्वत:चे अस्तित्व निर्माण करा.

नक्कीच काहीतरी सुलभ घडेल

कु पुजा विजय शर्मा, बी.कॉम.भाग— २

## स्वप्न

प्रथम मी तुज पाहता, स्वप्नात मी ग गुंतलो
नेत्र पाहता तव हरिणी, नयनात मी ग गुंतलो
ते लांब कुंदल पाहता, गेसुत मी ग गुंतलो
अधर जनु ते कमल कलिका, अंधारात मी गुंतलो
चोरता तु हृदय माझे, तुझीया हृदयात मी ग गुंतलो
घेण्या मिठीत तुजला, झालो समोर जेव्हा
तेव्हाच मज कळले होते
चित्रात मी गुंतलो
होतो स्वप्नात मी ग गुंतलो

कु.कविता दहापुते
बी.कॉम.भाग– २

---

## आयुष्याची धावपळ

जिवनभर सोबत असून
जवळ कधी बसत नाही
एकाच घरात राहून आम्ही
एकमेकांस कधी दिसत नाही

हरवला तो आपसातला
आपुलकीचा प्रेम संवाद
एकमेकास दोष देवून
नेहमी चाले वादविवाद

नेहमी धावतपळत आहे
पण दिशा मात्र कळत नाही
मनाचे पाऊल कधी
मनाकडे वळत नाही

एवढ जगून झाल
पण जगण्यास वेळ मिळत नाही
जगत आहे कशासाठी
हे मात्र काही कळत नाही

वेळ येईल एक अशी
घेवून जाईल माझा श्वास
एकाएकी थांबलेला असेल
माझा जीवन प्रवास

अजूनही वेळ आहे दिक्षा
जीवन जरा जगून घे
छान अशा जिवनाला
सुंदर डोळयाने बघून घे

कु दिक्षा निरंजन भालेराव
बी.कॉम.भाग– २

## ।। आयुष्य ।।

आयुष्यात आपल आपल्याच समजावून घ्याव लागत
या हळव्या मनाला तर खुप सांगाव लागत
आपलच आयुष्य आपल्याच सावराव लागत
का आपलच आयुष्य आपल्याच जगाव लागत
जन्म होतो तिच्या उदरातून रडतच येतो
आयुष्यातही क्षणोक्षणी रडतो
जेव्हा आयुष्य संपते तेव्हाही रडतो
पण स्वत:च जीवन जगतांनाही आयुष्यात
खुपदा खोट हसाव लागत
जीवनात स्वत:शीच झगडाव लागत
कधी थंडीचे गोठून मराव लागत
या आयुष्यात स्वत:च सरणही स्वत:च
रचाव लागत मग का अस जगाव पण
आयुष्य असं जगाव आपल्या माणसाला ओढ लावणार असाव
आयुष्य थोडसच जगाव पण त्यामध्ये
जन्मोजन्मीच प्रेम सदैव मिळणार आयुष्यात
प्रेम अस दयाव की घेणाऱ्या ओजळ
अपुरी पडावी.... आयुष्यात
मैत्री असी असावी की स्वार्थाचही भान
नसाव आयुष्य अस जगाव की
मृत्युनेही म्हणवा की जग असुन थोडस, येऊन मी नंतर
आयुष्य थोडसच असाव सुंदर
ज्यात कोणाबद्दल त्रिशा नसावी
ज्यात प्रेम देणार असाव
आपलच आयुष्य आपल्याच जगाव लागत
मग आपणच आपल सुंदर आयुष्य बनवाव

कु महेश्वरी शि. म्हातारमारे
बी.कॉम.भाग— २

---

## V.N. चा विद्यार्थी

आहे V.N. कॉलेजचा मी, आहे V.N. कॉलेजच माझ
मला कोणाच्या बाची भिती, मी बोलतोय V.N. कॉलेजचा विद्यार्थी
नका जाऊ तुम्ही या V.N. च्या बाहेर
हेच आहे आपल्या ज्ञानाचे माहेर, जर का घेतील ज्ञान
तर मिळेल मान, तुमच ज्ञान आहे किमती
मी बोलतोय V.N. कॉलेजचा विद्यार्थी, हा V.N. कॉलेजच आहे असा जसा
आनंदाचा मोठा परिवार तसा, तुम्ही शीस्त पाळा आणि हसा खेळ
गाजवा V.N. ची या किर्ती, मी बोलतोय V.N. कॉलेजचा विद्यार्थी
सांगतो तुम्हाला मी एक मोठी माहिती, वाढवा आपल्या अभ्यासाची गती
ठेवा चांगली निती, आणि मिळवा मती
तुम्ही राहू नका स्वार्थी, मी बोलतोयV.N.कॉलेजचा विद्यार्थी

सुयश मारोती पाचे
वर्ग ११ वा वाणिज्य



Scanned with OKEN Scanner

## बाबा

काय सांगू मोया बापाचे उपकार
मोया जीवनात आहे त्यांचा खुपच आधार
तो आहे, माझा बाप सांगून
अभिमान वाटतो

त्याने मोयासाठी केलेल्या कष्टाचा, मी सन्मान राखतो
बापाची किमया या जगात सर्वात निराळी
कुटुंबातील कोणत्याही संकटाला जातो तो पुढारी
धन्य झालो बाबा मला तुमच्या सरीखा
बाप मिळाला

तुम्हीच मोयामध्ये हा थोर विचारवंत घडवला
देवाला प्रार्थना करीतो की तुमची साथ सदाचं असावी
मोया मध्ये काहीतरी दररोज नविन घडवत राहावी
नाही सांगणार मोयावर कृपा आहे त्या परमेश्वराची
सांगणार अभिमानाने की मोयावर देणगी आहे बाबाची

गोपाल विष्णू गवई
११ वी वाणिज्य

---

## दुष्काळ

प्रस्तावना :— ग्रामिण भागातील एक दुष्काळग्रस्त शेतकरी हा कसा आपल्या परिस्थितीशी झुंज करुन सामोरे जातो. या बद्दल त्याचे मत प्रस्तूत काव्यात व्यक्त केले आहे.

हंगामात उन्हाळा कव रोग पाहू, संसाराच्या गाडयानं आलो नाकी नऊ

येत नाही पाणी दुकाय पडला कोरडा
वरडू वरडू माया भाऊ कोरडा झाला नरडा
फुटलं मा नशीब आता काय खाऊ—पिऊ

कोटयात नाही गाय कुदून आण खत
कर्जाच्या बोजाखाली सडून रायली पत, वैतागलो आता तोंडात आला जिऊ

यंदा नाही पिकलं तर पुढच्या वर्षी पिकनं
या आशेवर शेतकरी कुठरोग टिकनं, आसमानी कोपले कुठवर भिऊ

ज्याने दिलं शिर तोच शेर देईन
नशिबाच्या पुढे कोण कसं काय घेईन, आशेचा किरण आपल्या मनामंदी लाऊ

जवरोक हाय माया कंबरीत जोर
मांग नाही राहणार जाईन सदा समोर, सार काई देईन पण देणार नाही जिऊ

सत्यम इंदल चव्हाण
११ वी वाणिज्य

## मैत्री

थकलेले जीव सारे, सावलीला निजले होते

बाभळीचेझाड घराशी, फुलांनी सजले होते

पाखरांनी आपले घरटे, छपराला टांगले होते

भातकुलीचे डाव दरी, खेळ सारे मांडले होते

तेव्हा उमगले ते घर, मोठ्या मित्रानी बांधले होते.

अभिषेक संतोष पाचरणे
११ वी वाणिज्य

---

## लढाई

फुलाने अपेक्षा केली का कधी, काटयाकडून आधाराची?

जमिनीने कधी वाट पाहिली का, आभाळाच्या सावलीची?

किनाऱ्याला वाटली का, कधी भिती समुद्राच्या पाण्याची?

कधी वाऱ्याने संगत धरली का, शेवटपर्यंत पाचोळयाची?

अशीच लढाई आहे हो, आपल्या एका जीवनाची

फक्त एकटयानेच लढून, आहे ती जिंकण्याची

दामोदर श्रीकृष्ण सोनटक्के
११ वी वाणिज्य

---

## आई

मोठ्या जीवनाची सावली, आई माझी माऊली

कष्ट करोनी अतोनात, भरवलास मज घास
केलीस मोठ्यावर माया
जशी वृक्षाची छाया
मला जगण्याची दिशा तू दावली

मोठ्या जीवनाची सावली
आई माझी माऊली

विवेक सिध्दार्थ वंजारे
११ वी वाणिज्य

# का रे हा दुरावा

महिने मागून महिने, शेवटी वर्ष सरुन जाते
वृध्दाश्रमाच्या पायरीवर, वाट तुझी पाहते

भिजून जाते पदर, अन मन तिते राहते
कधी मधी मात्र, तुझी मनी आर्डर येते
पैसे नकोत यावेळी, तूच येवून जा
बाळा मला तोया, घरी घेवून जा

तुझा बा होता तोवर, काळ बरा गेला
तुझी आठवण काढत, उघडया डोळयांनी गेला

शेवटी पर्यंत सांगत होता, लेक माझा भला
तू मोठा साहेब, त्याच मोठ कौतूक त्याला
मोयाही हदयात फीटो

तुझा तू पाहून जा, बाळा मला तोया
घरी घेवून जा, दुष्काळाच्या साली
जन्म तुझा झाल, तुटया दुधासाठी
आम्ही चहा सोडून दिला
वर्षाकाठी एक कपडा

पुरवून पुरवून घातला, साल घातली बापाने
पण तुला शाळेमधी घातला, हव तर तू हे
सगळ विसरुन जा, पण बाळा मला
तोया घरी घेवून जा
धुणी भांडे करीन मी
केरकचरा भरीन मी, पुरणपोळया अडूवडया
तोयासाठी राधीन मी, नातवंडाच दुखल—खुपलं
संगळं बघेन मी, घाबरु नकोस त्याची आजी
असंनाही सांगणार मी
तोया घराची कामवली
म्हणून घेवून जा, पण बाळा मला
तोया घरी घेवून जा, शेकले रे डोळे बाळा
प्राणकंठी आले, तोया विना जगणे
आता मुश्कील झाले
विसरु कशी तुला मी
तोयामुळे आई झाले, बाळ कसं कुलभूषण
परकी मी का झाले, आता मोया थडग्यापाशी
"आई" म्हणून जा, जमलंच तुला तर
हा वृध्दाश्रम पाडून जा

कु.आरती राजाभाऊ सोळंके,
११ वी वाणिज्य

# मित्र

एक मित्र असा असावा
नेहमी मला हसवणारा कधीही न रडवणारा
मी हसतांना मोत्या डोळयातील अश्रु पुसणारा
आणि हक्काने माझे अश्रु पुसणारा
एक मित्र असा असावा......

त्याची सर्व सुख दु:ख मला सांगणारा
माझी सर्व सुख दु:ख स्वत: ऐकणारा
आणि हक्काने मला आपलं समजणारा
एक मित्र असा असावा......

नेहमी सर्वांची मदत करणारा
आपल दु:ख विसरुन सर्वांना आनंदी करणारा
आणि हक्काने त्यांना आपलंस करणारा
एक मित्र असा असावा......

मोत्या सुखा दु:खात सहभागी होणारा
मोत्या सोबत नेहमी राहणारा
माझी बडबड ऐकत ऐकत हसणारा
आणि हक्काने मला गप्प करणारा
एक मित्र असा असावा.....

मोत्यावर फार जिव लावणारा
मोत्यावर मनापूसन प्रेम करणारा
आणि हक्काने मला माझ म्हणणारा
एक मित्र असा असावा...... एक मित्र असा असावा.....

अभय गजानन खडसे, ११ वी वाणिज्य

---

# शिक्षक म्हणजे

शिक्षक म्हणजे,

आयुष्यात कलाटणी देणारी प्रेरणा ध्येयापूर्तीसाठी मार्ग दाखविणारी दिशा, कधी बिकट परिस्थितील, प्रेमाची सोय, तर कधी पाठवरील शाबासकीचा हात, कधी कौतुकाचे गोड शब्द तर कधी हातावर बसणारा छडीचा मार

शिक्षक म्हणजे,

चांगले संस्कार करणारी मूर्ती, संकटकाळात धैर्य देणारी स्फूर्ती
चारित्रयापूर्ण विद्यार्थी घडवणारा शिल्पकार, जादूची छड जी करते विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार

शिक्षक म्हणजे

सखोल मूलभूत ज्ञानाचे भांडार, दूर करी जीवनातील अज्ञानमय अंधार
अन्यायाविरुध्द आवाज उठविणारी तलवार, अनुभवातून निर्माण होणारा साक्षात्कार
असे हे शिक्षकांचे आजन्म न फिटणारे उपकार

धन्यवाद!

कु.ज्ञानेश्वरी संतोष लुंगे, ११ वी वाणिज्य



Scanned with OKEN Scanner

अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरुळपीर, जि.वाशिम. द्वारा संचालित



# श्री.वसंतराव नाईक कला महाविद्यालय, श्री.अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय, मंगरुळपीर.

अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरुळपीर, जि.वाशिम.
द्वारा संचालित
श्री.वसंतराव नाईक कला व श्री.अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय, मंगरुळपीर, जि.वाशिम.